follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.७२१०५/९९ * वर्ष २६ * अंक ३१३ सातारा : मंगळवार दि.१३ ऑगस्ट २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# मानधन वाढीसाठी अंगणवाडी सेविकांचा पुन्हा ठिय्या

## आझाद मैदानात उतरला लाखोंचा समुदाय!



**मुंबई :** राज्यभरातील अंगणवाडी सेविकांसंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. मुंबईतील आझाद मैदानावर अंगणवाडी सेविकांनी बेमुदत संप पुकारला आहे. याआधी ४ डिसेंबर २०२३ रोजी राज्यातील अंगणवाडी सेविकांनी राजव्यापी संप केला होता. मानधनात दरमहा ५ हजार रूपये वाढ होईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले होते. मात्र अद्यापही पगारवाढीसंदर्भात कोणताही प्रस्ताव दिला नसल्यामुळे अंगणवाडी सेविकांनी पुन्हा एकदा संपाची हाक दिली आहे.

मानधनात वाढ करण्याच्या मागणीसाठी अंगणवाडी सेविकांनी पुन्हा आक्रमक रुप धारण केले आहे. त्यामुळे राज्यातील अंगणवाडी सेविका आजपासून संपावर जाणार आहेत. तर येत्या २१ ऑगस्ट रोजी सेविका सरकार विरोधात मोर्चा काढणार असून यामध्ये २ लाख अंगणवाडी सेविका सहभागी होणार आहेत.

### काय आहेत अंगणवाडी सेविकांच्या मागण्या?

मानधनात वाढ करण्याचा निर्णय घ्यावा.
कायदेशीररित्या ग्रॅच्युइटी देण्यात यावी.
मान्य केल्याप्रमाणे मासिक पेन्शन योजना लागू करावी.
प्रलंबित प्रस्ताव तत्काळ मान्य करावा.

# राज्यात लवकरच एक लाख कोटींची गुंतवणूक

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रात येत्या आठ- दहा दिवसांत एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. ही गुंतवणूक राज्यातील विविध विभागांत असेल असेही ते म्हणाले.

गेल्या काही दिवसांत मराठवाड्यात टोयोटा, एथर, किर्लोस्कर आणि लुब्रीझॉल या कंपन्यांनी ५४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून त्यातील काही कंपन्यांना जमीन देण्यात आली आहे. यातून २० हजार जणांना रोजगार उपलब्ध होईल. मात्र, विधानसभा निवडणुकीपूर्वी ही गुंतवणूक येणारच नाही असे खोटे कथन तयार केले जात आहे. त्याला उत्तर देत कंपन्यांच्या व्यवस्थेतील अधिकाऱ्यांसह उद्योजकांनी सत्कार घडवून आणल्याची माहिती उदय सामंत यांनी दिली.

लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यघटना बदलणार असा अपप्रचार करण्यात आला. तसाच अपप्रचार उद्योगांबाबत पूर्वी करण्यात आले होते. वेदांता फॉक्सकॉन, एअर बस या प्रकल्पाचा काही एक पत्रव्यवहार नसताना पूर्वी न केलेल्या कामाचे बालंट आमच्यावर लादण्याचा प्रयत्न करण्यात आला. आता पुन्हा तोच प्रकार घडू शकतो. म्हणून कंपनी व्यवस्थापनातील अधिकाऱ्यांसह सरकारला मानपत्र देण्याचा कार्यक्रम छत्रपती संभाजीनगरमधील उद्योजकांनी घडवून आणला.

# शरद पवारांच्या घराबाहेरील आंदोलन हे देवेंद्र फडणवीसांचे कारस्थान

## मनोज जरांगे पाटलांचा गंभीर आरोप

**पुणे :** राज्यातील राजकीय पक्षांनी मराठा आरक्षणाबाबत आपली भूमिका स्पष्ट करण्याची मागणी मराठा समाजानं केली. त्यासाठी नेत्यांच्या घराबाहेर मराठा समाज आंदोलन करत आहे. आज मराठा समाजाकडून शरद पवार यांच्या पुण्यातील घराबाहेर आंदोलन करण्यात आलं. यावर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गंभीर आरोप केला.

छगन भुजबळ यांना मी सिरीयस घेत नाही. देवेंद्र फडणवीस जसे शिकवतात तसे मंत्री छगन भुजबळ बोलत आहेत. त्यांचे बोलणे म्हणजे जातीय द्वेषाने भरलेले आहे. त्यामुळे त्याला महत्त्व देण्याची गरज नाही,'' असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा छगन भुजबळांवर निशाणा साधला. ''आता त्यांना आमची किंमत समजली आहे. ओबीसी, मराठा एकच असून, आता तरी त्यांनी ओबीसीचे वाटोळे करू नये. तसंच राजकीय स्वार्थासाठी गरीब ओबीसी आणि गरीब मराठ्यांचे वाटोळे करू नये एवढंच काम करा, बाकीचं किती निवडून आणायचे आणि किती नाही हे मी बघतो,'' असं म्हणत जरांगे पाटलांनी भुजबळांवर हल्लाबोल केला.

फडणवीस आणि दरेकर यांचं कारस्थान : मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आज मराठा समाजाच्या वतीनं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या पुण्यातील घराबाहेर आंदोलन करण्यात येत आहे. याबाबत जरांगे पाटील यांना विचारलं असता ते म्हणाले, ''हे देवेंद्र फडणवीस आणि प्रवीण दरेकर यांचं कारस्थान आहे. मराठा समाज हा एकत्र झाला आहे. मात्र, त्यांना समाजात फ ूट दाखवायची आहे. देवेंद्र फडणवीस यांचं एकच स्वप्न आहे की, त्यांना मराठा समाजात फूट दाखवायची आहे. पण मराठ्यात फूट पडणार नाही. मी जोपर्यंत आहे तोपर्यंत फडणवीस यांचं स्वप्न पूर्ण होऊ देणार नाही.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी मी नुकतीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. मी त्यांना सांगितलं की, आरक्षणाच्या मुद्द्यावर सर्वपक्षीय बैठक बोलवावी. आम्हीही त्या बैठकीला उपस्थित राहू आणि भूमिका मांडू. मला खात्री आहे की मुख्यमंत्री हे सर्वपक्षीय बैठक बोलावतील. केंद्र सरकारला ५०म पेक्षा जास्त

# विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची तयारी सुरु

## फडणवीस घेणार जागावाटप अन् मित्रपक्षांशी चर्चेचा निर्णय



**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील राजकारणात अनेक मोठ्या घडामोडी घडत आहेत. त्यातच लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात विधानसभा निवडणुकाही होणार आहेत. असे असताना आता राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जागावाटप आणि मित्रपक्षांशी चर्चा करण्याचा निर्णय घेतील, अशी माहिती मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी सांगितले.

भाजपच्या मुंबई विभागाच्या कोअर कमिटीची बैठक होऊन हा निर्णय घेण्यात आल्याचेही शेलार यांनी सांगितले. आशिष शेलार यांनी माध्यमांशी बोलताना विविध मुद्यांवर भाष्य केले. ते म्हणाले, 'काही महिन्यांत होणाऱ्या विधानसभा निवडणुकीची तयारी सुव्यवस्थित करून अनावश्यक विलंब टाळण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. मुंबईत कोअर कमिटीची (राज्य युनिटची) बैठक झाली असून, त्यामध्ये जागावाटप आणि विधानसभा मतदारसंघ निवडण्यासंबंधीचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार फडणवीस यांच्याकडे सोपवण्यात आले आहेत.'

### केंद्रीयमंत्र्यांसह अनेकांची उपस्थिती

भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पक्षाचे निरीक्षक आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादवही उपस्थित होते. तसेच या बैठकीला भाजपचे राष्ट्रीय सचिव विनोद तावडे, केंद्रीय मंत्री आणि मुंबई उत्तरचे खासदार पियुष गोयल हेही उपस्थित होते.

### लोकसभेत भाजपच्या जागा घटल्या

भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीमध्ये एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचाही समावेश आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुती आघाडीला राज्यातील ४८ पैकी केवळ १७ जागा मिळाल्या. तर राज्यात भाजपच्या लोकसभेच्या जागा २३ वरून नऊवर आल्या आहेत. काँग्रेस, शिवसेना (UBT) आणि NCP (SP) यांचा समावेश असलेल्या महाविकास आघाडीला ३० जागा मिळाल्या आहेत.

## जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखडा : बायपासला परस्पर मान्यता

**पुणे :** श्री क्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखडा करण्यात आला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील बाह्यवळण रस्त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) जिल्हा विकास आराखडा समितीचे अध्यक्ष असलेल्या जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांची परवानगी न घेताच परस्पर प्रशासकीय मान्यता दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही बाब उघड झाल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी तातडीने निविदेला स्थगिती दिली. पुरंदर तालुक्यातील श्री खंडोबा देवसंस्थान आणि जेजुरी शहर विकासासाठी राज्य शासनाने सुमारे ३४९.४५ कोटी रुपयांचा श्रीक्षेत्र जेजुरीगड तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला मान्यता दिली आहे.

# मातोश्रीबाहेर आंदोलने करणारी माणसे एकनाथ शिंदेंची : संजय राऊत



**मुंबई:** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानाबाहेर मुस्लीम समाजातील काही संघटनांनी रविवारी (११ ऑगस्ट) आंदोलन केले. वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकावर उद्धव ठाकरेंनी आपली भूमिका स्पष्ट करण्याची मागणी मुस्लीम संघटनेच्या आंदोलकांनी यावेळी केली. पण मातोश्रीबाहेर दंगा करणारी माणसे ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची होती असा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे. आज सकाळी माध्यमांशीबोलताना त्यांनी आंदोलनातील लोकांचे एकनाथ शिंदेंसोबत असलेले फोटोही दाखवले.

संजय राऊत म्हणाले, सुपारीचे सगळे खेळ हे वर्षा बंगल्यावरून खेळले जात आहेत. मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर आणि ठाण्यातून या सुपारी गँग चालवल्या जातात. हे सर्व भाडोत्री लोक आहेत. वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकासाठी मातोश्री निवासस्थानाबाहेर मुस्लीम समाजातील लोकांनी आंदोलन केले. पण काही कारणच नव्हते. कारण या विधेयक आणि त्यातील सुधारणांवर अजून संसदेतच चर्चा व्हायची आहे. अहमदशहा आब्दाली महाराष्ट्रात मराठी माणसात भांडणे लावायचा प्रयत्न करत आहे. त्याला हे सुपारीबाज बळी पडत आहेत.

तुम्ही आम्हाला बघून घेऊ अशा धमक्या देत आहात, मग महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का लावतोय, महाराष्ट्राची लूट करतोय त्या अहमदशहा आब्दालीला आव्हान द्या, आम्ही समर्थ आहोत. तुमच्यात हिंमत असेल तर अहमदशहा आब्दालीला आव्हान द्या, असे खुले आव्हान संजय राऊत यांन दिले आहे.

यावेळी बोलताना संजय राऊत यांनी मातोश्रीबाहेर आंदोलन करणाऱ्यांचे फोटो दाखवत मोठे दावेही केले. एक फोटो दाखवत संजय राऊत म्हणाले, सलमान शेख हा मातोश्रीच्या बाहेर होता. हेच महाशय कोणासोबत आहेत, हे पाहा. हा अपरार सिद्धीकी हाही मातोश्रीबाहेर घोषणाबाजी करत होता. एलीयास शेख कोणासोबत आहेत हेही पाहून घ्या, हे अकरम शेख कोणासोबत आहेत, जिशान चौधरी यांना तर माहात्मा म्हणावे लागेल. हेतर वर्षा बंगल्यावर मिसेस मुख्यमंत्र्यांसोबत दिसत आहेत. म्हणजे हे सगळे भाडोत्री लोक आहेत. म्हणजे संपूर्ण फॅमिलीच सुपारीबाज आहे. अशी जहरी टीकाही संजय राऊत यांनी केली.

# सातारा-लोणंद रस्त्यावर भीषण अपघातात

## दोन ठार, अपघातानंतर ट्रक पेटला





**सातारा :** लोणंद रस्त्यावर भीषण अपघातात दोन ठार, अपघातानंतर ट्रक पेटला (छायाचित्र - लोकसत्ता टीम)

सातारा: सातारा-लोणंद रस्त्यावर अंबवडे सं. वाघोली (ता. कोरेगाव) गावानजीक सोमवारी दोन ट्रकची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोघे चालक ठार झाले. यातील एका ट्रकने अपघातानंतर पेट घेतल्याने त्याच्या चालकाचा ट्रकमध्ये अडकून मृत्यू झाला. याशिवाय अन्य दोघे यामध्ये जखमी झाले आहेत. अल्ताफ मन्सुरी, (वय-२०, रा. भगोरा, ता. जिरापूर, जि. राजगड, मध्यप्रदेश) आणि महेश दयानंद घुगे (वय ३७, हल्ली रा. गोकुळ शिरगाव, कोल्हापूर) असे मृत चालकांचे नाव आहे.

लोणंद बाजूकडून कडप्पा फरशी भरलेला ट्रक (क्रमांक आरजे १७ जीबी ६५६१) साताऱ्याच्या दिशेने चालला होता. तर आयशर (क्रमांक एमएचजी -७७७५ ) हा मालट्रक साताऱ्याहून लोणंदच्या दिशेने निघाला होता. आंबवडे चौक ते पिंपोडे खुर्द गावांच्या दरम्यान या ट्रकची समोरासमोर जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की दोन्ही ट्रकच्या केबिनचा चक्काचूर झाला. त्यामध्ये कडप्पा भरलेल्या ट्रकचा चालक अल्ताफ मन्सुरी हा जखमी अवस्थेत अडकला होता. धडक इतकी भीषण होती की ट्रकच्या केबिनने पेट घेतला. त्या स्थितीत ट्रकचा जखमी झालेला क्लिनर मांगीलाल रामप्रसाद भोल याने जखमी चालकाला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याला अपयश आहे.

मांगीलालच्या डोळ्यासमोर चालकाचा गाडीच्या आगीत जळून मृत्यू झाला. अन्य आयशर ट्रकच्याही केबिनचा पूर्ण चक्काचूर झाला. यामध्ये त्याचा चालक महेश दयानंद घुगे हा गंभीर जखमी झाला होता. त्याला वाठार स्टेशन पोलिसांनी तातडीने उपचारांसाठी शासकीय रुणालय सातारा येथे दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्याचाही मृत्यू झाला.

# पोलीस भरतीत सगळे मुस्लिम, मराठ्यांसाठी घातक!

## आमदार नितेश राणे



**मुंबई :** मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठी आम्ही राज्याच्या कानाकोप-यात फिरलो. मात्र आज चार-पाच टाळक्यांना सोबत घेऊन मनोज जरांगे पाटील हे मराठ्यांच्या नावाखाली मुस्लिमांच्या दाढ्या कुरवाळत आहेत, असा घणाघाती आरोप भाजपा आमदार नितेश राणे यांनी केला आहे.

तुमच्या आंदोलनाचा मराठा समाजाच्या लोकांना किती फायदा मिळतो आहे. किती मराठी मुलांना नोक-या मिळत आहेत, असा सवालही नितेश राणे यांनी केला आहे.

नुकत्याच झालेल्या पोलीस भरतीत जर सगळे मुस्लिम असतील तर ते मराठा समाजासाठी घातक आहे. यावर आम्ही बोलणारच असे ठणकावून सांगताना भाजपा आमदार नितेश राणे यांनी पत्रकार परिषदेत पोलीस भरतीची यादीच वाचून दाखवली. या यादीत सर्व मुस्लिम मुलांची नावे असल्याने जरांगेंच्या आंदोलनाची नितेश राणे यांनी 'पोलखोल' केली.

दोन दिवसांपूर्वी जरांगे पाटील यांना मोहम्मद अली जिनाची उपमा दिली तेव्हा महाविकास आघाडीतील आणि त्याला समर्थन करणाऱ्या ब्रिगेडी लोकांना फार झोंबले. पण या उपमा देण्यामागे काही कारणे आहेत. आम्ही पहिल्या दिवसापासून एकच बोलत आहोत की, आमचा मराठा समाजाला पाठिंबा आहे. आम्ही पण मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठी राज्याच्या कानाकोप-यात फिरलेलो आहोत. पण आज जरांगे पाटील यांची भाषा एका राजकीय नेत्यांची आहे. ते फक्त भाजपावर टीका करत आहेत. महाविकास आघाडीवर टीका करत नाही. ते भाजपा नेत्यांवर बोलतात तसे महाविकास आघाडीच्या नेत्यांवर खालच्या पातळीवर बोलत नाहीत. म्हणूनच ज्या जिनाने हिंदू मुस्लिमांमध्ये फूट पाडली तीच भूमिका जरांगे पाटील घेत असतील तर आमचा त्याला विरोध आहे. मराठा समाजाच्या हिताचे बोलाल तर समर्थन देऊ. मात्र राजकीय भाषा करत असाल तर विरोधच असेल आणि तुम्हाला राजकीय भाषेतच सडेतोड उत्तर देऊ, असे नितेश राणे यांनी ठणकावून सांगितले. बीड मध्ये झालेल्या पोलीस भरतीत सगळे मुस्लिम मुलं असल्याचे यावेळी नितेश राणे यांनी सांगितले.

# लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही चित्र बदला,

## शरद पवार यांची शेतकऱ्यांना हाक

**सोलापूर :** देशातील आणि राज्यातील भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या हिताच्या आड येणारे आहे. देशभर सरकारविरोधात शेतकऱ्यांमध्ये रोष वाढला असून, त्याची प्रचिती लोकसभा निवडणुकीत आली आहे. लोकसभेप्रमाणेच आता महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी निवडणुकीतही चित्र बदलण्यासाठी शेतकऱ्यांनी एकजूट दाखवून सरकार बदलावे, अशी हाक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली.

शरद पवार म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहा वर्षांपूर्वी सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या शेती मालाला उत्पादन खर्चाच्या दुप्पट भाव मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु सत्तेत आल्यानंतर मागील दहा वर्षांत शेतीमालाला एकदाही दुप्पट भाव मिळाला नाही, तर उलट, शेतकऱ्यांच्या आत्महत्या पूर्वीपेक्षा दुप्पट झाल्या. सरकारची शेतीविषयक धोरणे हिताआड येणारे आहेत. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीत ऐतिहासिक निर्णय घेऊन भाजपला त्यांची जागा दाखविली. त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीतही असाच निर्णय घ्यायचा आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर शेतकरी यांच्या हिताची जपणूक केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले. राज्यात कमी दरामुळे आणि जास्त उत्पादन खर्चामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २० हजार कोटींचा फटका सहन करावा लागला. तर कांदा निर्यातबंदीमुळे पाच हजार कोटींचे नुकसान शेतकऱ्यांना सोसावे लागले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कांदा निर्यातबंदीचा मोदी सरकारचा निर्णय चुकीचा होता, अशी कबुली दिली. परंतु अजित पवार यांनी भाजपच्या सोबत जाणे हेच मुळात चुकीचे होते. लाडकी बहीण योजना सरकारने घाई गडबडीत आणली आहे. राज्यात महाविकास आघाडी सत्तेत येणार आहे. त्यानंतर लाडकी बहीण योजना बंद न करता उलट, त्याची व्याप्ती वाढविली जाईल, असेही आश्वासन आमदार रोहित पवार यांनी दिले. यावेळी खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचा शरद पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# पुण्यात अवैध कब्जा करुन, दिव्यांगाला केले जबरदस्ती बेघर

**पुणे :** पुण्यात विश्रांतवाडीतील देठेवाड्याचे रहिवासी अमोल देठे हे १००% दिव्यांग आहेत. देठेवाडीत त्यांचे वडिलोपार्जित घर आहे. वाड्यातीलच पिंट्या धिवार आणि त्याच्या घरच्यांनी अमोल यांच्या दिव्यंगत्वाचा फायदा घेत त्यांना राहत्या घरातून जोर जबरदस्तीने काढून टाकले व अवैध पद्धतीने त्यांच्या घरावर कब्जा केला आहे. जर याबाबत कोणाकडे तोंड उघडले तर तुझे काही खरे नाही. ताबडतोब पुणे शहर सोडायचे अशी धमकी दिली. म्हणून अमोल आज पुणे सोडून रस्त्यावर भिक मागण्यास मजबूर आहे.



पुण्याच्या विश्रांत वाडीतील रहिवासी चाळीस वर्षीय अमोल देठे यांच्याबाबत घडलेला एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. अमोल हे शंभर टक्के दिव्यांग असुन त्यांचे आई वडील हयातीत नाही. आई वडिलांच्या पश्चात आजी सारुबाई देठे यांनी संभाळ केला. जन्मतः दिव्यांग असल्याने त्यांचे संपूर्ण जीवन इतरांवर अवलंबून आहे. आजी गेल्यानंतर अमोल यांच्यावर फार वाईट दिवस आले. 'कोण देईल तेव्हा खाईल' अशी परिस्थिती त्यांच्यावर आली. पण त्यांचा नाईलाज होता दिव्यांगत्वामुळे त्यांना स्वतःच्या पायावर साधे उभे ही राहता येत नाही. एक एक दिवस काढणे त्यांना कठीण झाले होते. अशातच कमी की काय ? जे वाड्यातीलच पिंट्या धिवार आणि त्याच्या घरच्यांनी अमोल यांना त्यांच्या राहत्या घरातुन बाहेर काढले आणि त्यांच्या घरावर अवैधपणे कब्जा केला. तसेच जर याबाबत कोणाकडे तोंड उघडले तर तुझे काही खरे नाही, अशी धमकी दिली. अगोदरच 'हालत का मारा' अशी त्यांची परिस्थिती आणि त्यात अशा जीवघेण्या धमकीला घाबरून अमोल निमूटपणे देठेवाड्यातून बाहेर पडले. कोणाचाही आधार राहिला नाही म्हणून रस्त्यावर भीक मागून दिवस काढण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय नव्हता. या सर्व परिस्थितीची हकीकत अमोलची मोठी बहिण मनिषा जगताप यांना समजली.

मनिषा यांनी अमोलची शोधा शोध चालू केली असता त्यांना अमोल जंगलात अतिशय दयनीय अवस्थेत सापडले. तसेच अमोल यांनी त्यांच्यासोबत घडलेला प्रकार बहिण मनिषाला कथन केला. लहान भावाची ही अवस्था बघून मनिषाने हिम्मत करून याचा जबाब विचारण्याकरिता पुण्याला गेली असता, तेव्हा समजले की, ज्यांनी या घराचा कब्जा केला आहे त्यांनी अमोल यांच्या घरात भाडेकरू ठेवले असून ते स्वतः इतर ठिकाणी राहत आहेत. मनिषा यांनी नशिक ते पुणे असे चार - पाच वेळेस ये जा केली परंतु, त्यांचा सामना काही झाला नाही. बहिण मनिषा यांची आर्थिक परिस्थिती बेताची असून या अन्याय विरोधात लढण्याइतपत देखील त्यांची परिस्थिती नाही. म्हणून तर आजपर्यंत ते अमोल यांच्या हक्काच्या घरावर कब्जा करून बसले आहेत.

सध्या अमोल नाशिक येथे आपल्या मोठ्या बहिणीकडे आहेत. बहिणीची परिस्थिती बेताची आहे याची अमोल यांना जाणीव आहे. बहिण मनिषा यांची तब्येत सतत बिघडलेली असते. भावाची अशी परिस्थिती पाहून माझ्या पश्चात भावाचे काय होईल ? हा प्रश्न नेहमीच त्यांना पडलेला असतो. आम्हाला न्याय मिळेल की नाही ? माझ्या भावासोबत जे घडले त्याला कोण वाचा फोडेल की नाही ? असे प्रश्न दोघं भावंडं विचारत आहेत.

माझी तब्येत ठीक झाली की, मुख्यमंत्री शिंदे साहेब आणि उपमुख्यमंत्री अजितदादा यांची भेट घेणार आमच्यावर झालेला अन्याय दूर करा व पुणे पोलिस प्रशासनास योग्य ते आदेश द्यावे. असे गाऱ्हाणे मांडणार असल्याचे एका पत्राद्वारे कळविले.

माझा गुन्हा फक्त इतकाच आहे की, मी अपंग आणि अढानी आहे. म्हणून माझ्यावर ही वेळ आली आहे. मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुखयमंत्री अजिदादा पवार, दिव्यांगाचे काम करणारे आमदार बच्चु कडू साहेब व सर्व सामाजिक संघटना,कार्यकर्ते यांना हाथ जोडून विनंती आहे की, माझे घर मला मिळवून द्यावे आणि जबाबदार लोकांवर कारवाई करून मला नुकसान भरपाई मिळवून द्यावी. जेणे करून माझे पुढचे जीवन सुरळीत होईल.



# कर्नाळ परिसरात बिबट्याचा वावर

**सांगली :** सांगलीपासून आठ किलोमीटर अंतरावर कर्नाळ-नांद्रे परिसरात बिबट्याचा वावर आढळून आला असून वन विभागाने खात्री करुन लोकांना सावध राहण्याचा सल्ला दिला आहे. नावरस वाडी मधील पोलीस पाटील यांनी शनिवारी रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास वन विभागाला फोन करून बिबट पाहिल्याचे कळवले.

कर्नाळ नांद्रे रस्त्यावरील नवीन झालेल्या पुलाच्या जवळ दोन महिलांनी बिबट पाहिला आहे. माहिती मिळताच वन विभाग चे कर्मचारी व वनपाल तुषार भोरे हे जागेवर पोचले. जागेची पाहणी केली असता बिबट या वन्य प्राण्याच्या पाऊल खुणा दिसून आल्या. या परिसरात फिरती करताना बिबट्याचे दर्शन वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना झाले. ३ ते ४ वर्ष वयाचा बिबट समक्ष पाहिल्याचे वन विभागाने पोलीस पाटील व इतरांना सांगितले . बिबट त्याच्या त्याच्या मार्गाने निघून जाई पर्यत वन विभाग थांबून होते.तो तिथून निघून गेल्या नंतर वन विभाग माघारी गेले.

पण पुन्हा काही तासांनी बिबट तिथून काही अंतरावर नांद्रे येथील रहिवाशी शेटे यांनी गावाकडे जात असताना रात्री अडीच वाजण्याच्या सुमारास दिसून आला. त्यांनी रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांना या बाबत माहिती दिली व त्याचे मोबाईल मध्ये चित्रीकरण केले. त्यांना पाहून बिबट उसात निघून गेला. गेली ३ वर्षे सदर परिसरात त्याचा वावर दिसून आलेची माहिती वन विभाग कडून देण्यात आली आहे. तो कर्नाळ मधील ओढ्याच्या कडेने फिरती करत असल्याचे बऱ्याच वेळेस आढळून आले आहे. हा ओढा भोसे, कवठे, शिरगाव, कर्नाळ, नावरस वाडी, डिग्रज हद्दीच्या गावातून वाहत कृष्णेला मिळतो.ओढ्याच्या कडेने दाट झाडी आहे. वर्षभर ओढ्याला भरपूर पाणी असते. या कारणांनी बिबट बरेच दिवस याच भागात फिरती करताना दिसून आला आहे. त्याने आजुन कोणावर ही हल्ला केलेला नाही अथवा पाळीव जनावर पशू मारल्याची घटना निदर्शनास नाही आहे.

# २१ ऑगस्टच्या भारत बंदमध्ये महाविकास आघाडीने उतरावे !

## आंबेडकरवादी नेत्यांचे आवाहन

**मुंबई :** उप वर्गीकरण करण्याच्या नावाखाली अनुसुचित जातींचे विभाजन केले जात आहे. त्याविरोधात येत्या २१ ऑगस्ट २०२४ रोजी देशभरातील दलित मागासांच्या असंख्य संघटना ' भारत बंद ' पाळणार आहेत. महाविकास आघाडीने त्या बंदमध्ये उतरावे . त्यातून संविधानाशी बांधिलकी आणि अनुसुचित जातींबाबतचा कळवळा दाखवून द्यावा, असे आवाहन आंबेडकरवादी भारत मिशनतर्फे एका पत्रकार परिषदेतून आज बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीचे नेते, घटना तज्ज्ञ डॉ सुरेश माने यांनी केले.

यावेळी दलित पँथरचे नेते सुरेश केदारे, चर्मकार नेते अच्युत भोईटे, विचारवंत प्रशांत रूपवते, शिक्षण तज्ज्ञ डॉ. जी के डोंगरगावकर, ऍड. धनराज जयमंगल, ज्येष्ठ पत्रकार बंधुराज लोणे, प्रा.अनिल वानखेडे, माजी उप सचिव सी.के. जाधव, विनोद ढोके , माजी उप जिल्हाधिकारी बाबासाहेब आढागळे, आंबेडकरवादी भारत मिशनचे संयोजक , ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ आणि सतीश डोंगरे हे उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत ४०० जागा जिंकून संविधान हटवण्याचे मनसुबे भाजप नेत्यांनी जाहीर केले होते. त्यावेळी राज्यातील दलित, बौद्ध जनतेने भरघोस मतदान करत महाविकास आघाडीला ३० जागा जिंकण्यास साथ दिली, याची आठवण माने यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार) आणि शिवसेना ( उद्धव ठाकरे ) यांना करून दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसुचित जातींना एक वर्ग म्हणून गठित केले होते. उप वर्गीकरण केल्याने त्याला सुरुंग लागणार आहे, असे सांगून डॉ. माने म्हणाले की, केंद्र आणि महाराष्ट्र सरकारने तर सर्वोच्च न्यायलयाच्या निकालाच्या पूर्वीच उप वर्गीकरणासाठी समित्याही नेमल्या आहेत! ही गोष्ट खूप काही सांगणारी आहे.

# महायुतीत जागावाटपाचा त्वरित निर्णय घ्या: भाजप कोअर कमिटीत मागणी

**मुंबई:** लोकसभा निवडणुकीत घटक पक्षांना मिळालेल्या मतांच्या आधारे महायुतीतील जागा वाटपाबाबत त्वरित निर्णय घेण्यात यावा, अशी आग्रही मागणी भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश पातळीवरील नेत्यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे. पक्षाने दीडशेहून अधिक जागा लढविण्याचा त्यांचा आग्रह ही कायम आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीमध्ये भाजपने सर्वाधिक मते मिळवली आहे. विधानसभा मतदारसंघनिहाय मतांची आकडेवारी तपासून भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांनी किती जागा लढवायच्या आणि इतर छोट्या घटक पक्षांना कोणत्या जागा द्यायच्या, याबाबत त्वरित निर्णय घ्यावा. आवश्यकता असेल अशा मतदारसंघात सर्वेक्षण करावे आणि आवश्यकतेनुसार महायुतीतील घटक पक्षांनी मतदारसंघांची अदलाबदली करावी, अशा मागण्या भाजपच्या स्थानिक नेत्यांनी पक्षाकडे केले आहेत.

भाजपाच्या कोअर कमिटीची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत विधानसभा निवडणुकीच्या तयारी बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. महाराष्ट्राचे प्रभारी असलेले केंद्रीय नेते भूपेंद्र यादव यांनी निवडणूक तयारीचा आढावा घेण्यासाठी राज्याचा दौरा करावा, असा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार यादव हे १७ ऑगस्टपासून राज्याचा दौरा करणार आहेत. यावेळी ते जिल्हा स्तरावरील पदाधिकाऱ्यांची भेट घेणार असून त्यांना निवडणुकीच्या तयारीसाठी कानमंत्र देणार आहेत.

# रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी महाआक्रोश मोर्चा

**रत्नागिरी :** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना व जुनी पेन्शन संघटना समन्वय समिती यांच्या वतीने रविवारी जिल्हाधिकारी कार्यालय येथे जुनी पेन्शन योजना लागू करणे तसेच शिक्षण सेवक पद रद्द करणे यांसह विविध मागण्यासाठी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. पेन्शनसाठी भजने, गोंधळ, भारूड व गाऱ्हाणे घालत आणि घोषणा देत शिक्षकांनी जयस्तंभ परिसर दणाणून सोडला.

१ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत लागलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना बंद करून नवीन अंशदायी परिभाषित पेन्शन योजना सरकारने लागू केली आहे. यात देखील बदल करण्यात येऊन आता जीपीस या नवीन योजनेची घोषणा करण्यात आली आहे. परंतु यामुळे कर्मचाऱ्यांचे म्हातारपणीचे आयुष्य अंधकारमय बनले आहे.

त्यामुळे १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करावी या प्रमुख मागणीसह शिक्षण सेवक योजना रद्द करावी, खात्यात जमा असणाऱ्या रकमांवर आजपर्यंतचे व्याज मिळावे, सुधारित संच मान्यता निकष रद्द करावेत, शिक्षक भरतीच्या जाचक अटी रद्द कराव्यात, बीएलओ कामे शिक्षकांकडून काढून अन्य यंत्रणेमार्फत करून घ्यावेत, एमएससीआयटीची मुदत वाढवून मिळावी, नवभारत साक्षरता अभियानसह अशैक्षणिक व ऑनलाईन कामे इतर यंत्रणेमार्फत करून घ्यावीत. अशा मागण्यांसह रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील राज्य शासकीय - निम शासकीय कर्मचारी संघटना, आरोग्य कर्मचारी संघटना, जिल्हा परिषद कर्मचारी संघटना, प्राथमिक व माध्यमिक शिक्षक संघटना, दिव्यांग कर्मचारी संघटना, त्याचबरोबर शिक्षकेतर संघटनांनीसुद्धा या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा दर्शवून मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

या आंदोलनात रत्नागिरी जिल्ह्यातील हजारो कर्मचारी सहभागी झाले होते. यानंतर शिष्टमंडळाच्या वतीने निवासी जिल्हाधिकारी सुर्यवंशी यांना निवेदन देऊन आंदोलनाची सांगता करण्यात आली.

# साखर निर्यातीवरील निर्बंध कायम



**पुणे :** केंद्र सरकार पुढील महिनाभरात इथेनॉल निर्मितीवरील निर्बंध शिथील करण्याचा आणि साखरेचे किमान विक्री मूल्य वाढविण्याबाबतचा निर्णय घेऊ शकते. पण, साखरेच्या निर्यातीवरील निर्बंध कायम राहण्याची दाट शक्यता आहे. देशाच्या गरजेइतकी साखर उत्पादित करून उर्वरित उसापासून इथेनॉल निर्मिती करण्यावर सरकारचा भर राहणार आहे.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या (एनएफसीएसएफ) राष्ट्रीय पुस्काराचे शनिवारी (१० ऑगस्ट) दिल्लीत केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत वितरण झाले. अमित शहा यांनी आपल्या भाषणात साखर उद्योगाच्या मागण्यांवर थेट भाष्य केले नाही. मात्र, साखर उद्योगाच्या मागण्या सविस्तरपणे जाणून घेतल्या आहेत. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने नाव न जाहीर करण्याच्या अटीवर दिलेल्या माहितीनुसार, साखर उद्योगाकडून केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्याकडे साखरेचे विक्री मूल्य प्रति किलो ३१ रुपयांवरून ४१ रुपये करा. उसाचा रस, पाक आणि बी हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल निर्मिती करण्यावर असलेले निर्बंध उठवा आणि किमान २० लाख टन साखर निर्यातीला परवानगी द्या, अशी मागणी करण्यात आली आहे. शहा यांनी आपल्या भाषणात वरीलपैकी कोणत्याच मुद्यावर थेट भाष्य केले नाही. पण, पुढील महिनाभरात साखरेचे विक्री मूल्य वाढविण्याबाबत आणि इथेनॉल निर्मितीवरील निर्बंध हटविण्याबाबत निर्णय होऊ शकतो. केंद्र सरकार त्याबाबत सकारात्मक आहे. पण, साखर निर्यातीला परवानगी मिळण्याची शक्यता कमी आहे. देशाला एका वर्षाला सरासरी २८० ते ३०० लाख टन साखरेची गरज असते. २०२० -२१ पासून दरवर्षी सरासरी साखर उत्पादन ३५० लाख टनांच्या आसपास राहिले आहे. त्यामुळे अतिरिक्त साखरेच्या निर्यातीला परवानगी देण्याची मागणी होत आहे. पण, केंद्र सरकार अतिरिक्त साखर उत्पादित न करता कारखान्यांनी उसापासून थेट इथेनॉल निर्मिती करावी, अशी भूमिका घेत आहे.

# अण्णाभाऊ साठे यांचे लिखाण वैचारिक गुलामगिरी तोडणारे: प्रा सुकुमार कांबळे

**पुणे :** साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर खूप प्रेम होते. बाबसाहेबांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्याचा त्यांनी कायम प्रयत्न केला. जात हे विष असल्याचे सांगत जाती - धर्माच्या पलीकडे जाऊन त्यांनी माणुसकीचे समर्थन केले. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून वंचित - शोषितांच्या समस्या जगासमोर मांडल्या. बंडखोर स्त्री पात्रांच्या माध्यमातून धार्मिक, वैचारिक गुलामगिरी तोडणारे लिखाण केल्याचे प्रतिपाडान ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुकुमार कांबळे यांनी केले.

सम्यक विहार व विकास केंद्र, शाहू चौक, बोपोडी पुणे येथे विश्वभुषण. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जीवन गौरव पुरस्कार २०२४' च्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात प्रा. सुकुमार कांबळे बोलत होते. याप्रसंगी दिवंगत लोकशाहीर दिनानाथ रामचंद्र साठे, दिवंगत विनायक जाधव यांना मरणोत्तर पुरस्कार प्रदान करण्यात आले ते अनुक्रमे विलास साठे आणि संगीता जाधव यांनी स्वीकारले. तसेच ज्येष्ठ विचारवंत रमेश राक्षे यांना ही जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी विश्वभुषण. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष परशुराम वाडेकर, ज्येष्ठ कार्यकर्ते अंकल सोनवणे, सुनिता वाडेकर (माजी उपमहापौर, पुणे), अविनाश कदम (अध्यक्ष, शिवाजी नगर मतदार संघ आरपीआय), विठ्ठल गायकवाड, समितीचे सरचिटणीस दीपक म्हस्के आदी उपस्थित होते.



पुढे बोलताना प्रा. सुकुमार कांबळे म्हणाले, महापुरुषांनी जातीच्या भिंती तोडत सर्वांना सोबत घेऊन जाणारी वाट निर्माण केली मात्र आज आपल्याकडे प्रत्येक जातीला एकमेकांपासून वेगळे करण्याचा डाव राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि अन्य काही शक्ती आखत आहेत. अनुसूचित जातीतील बौद्ध विरुद्ध अन्य जाती अशी फुट पाडण्याचा प्रयत्न हा त्याचाच भाग आहे. आपल्याला संविधान वाचवायचे असेल तर दलित, बहुजन समाजाने एकत्र येण्याची गरज असल्याचे प्रा. कांबळे यांनी नमूद केले.

सत्काराला उत्तर देताना रमेश राक्षे यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परशुराम वाडेकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाराष्ट्राचे महागायक विजय कावळे यांचा परिवर्तनवादी गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक म्हस्के यांनी केले तर आभार सुनीता वाडेकर यांनी मानले.

# मराठी मुस्लिम सेवा संघाचा मराठा आरक्षणासाठी पाठिंबा

**पुणे :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी सकल मराठा समाजाने काढलेल्या शांतता रॅलीमध्ये सहभागी होवून मराठी मुस्लिम सेवा संघाने पाठिंबा दिला.मराठा समाज आरक्षणाची जी मागणी करीत आहे,ती योग्य असून सरकारने चालढकल करू नये,असे आवाहन मराठी मुस्लिम सेवा संघाचे अध्यक्ष फकीर महंमद ठाकूर यांनी पुण्यात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात करण्यात आले आहे. दरम्यान ,रविवार दि ११ ऑगस्ट रोजी पुण्यात काढण्यात आलेल्या शांतता रॅलीत मराठी मुस्लिम सेवा संघाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले. त्यांनी मनोज जरांगे -पाटील यांचे स्वागत केले.

या कार्यकर्त्यांनी मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांना पाण्याच्या बाटल्यांचे वाटप केले.यामध्ये संघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष इब्राहिम खान, पृथ्वीराज सुतार, शिवसेनेचे शहराध्यक्ष गजानन भाऊ थरकुडे,माजी आमदार शरद ढमाले,सिकंदर मुलानी, असरार खान,नजीर शेख, अरबाज शेख यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सातारा जिल्हा भाजपचा बालेकिल्ला झाल्याचे चित्र येत्या विधानसभेला दिसेल

## नागरी विमान वाहतूक व सहकार केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा विश्वास : कराडात स्व. यशवंतराव चव्हाण समाधीस्थळी अभिवादन

**कराड :** लोकसभेत उदयनराजे भोसले यांच्या रूपाने भाजपला, तसेच महायुतीला मोठे यश मिळाले. त्यामुळे आता सातारा हा महायुतीचा बालेकिल्ला झालाय. जिल्ह्यातील आठ पैकी सहा आमदार महायुतीचे असून उर्वरित दोन आमदारही भाजपचे देऊन याठिकाणी शंभर टक्के सातारा जिल्हा भाजपचा बालेकिल्ला झाल्याचे चित्र येत्या विधानसभेत दिसेल, असा विश्वास नागरी विमान वाहतूक व सहकार केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला.

येथील यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीस्थळी अभिवादन केल्यानंतर प्रसारमाध्यमांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या उत्तरादाखल ते बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, प्रदेश सरचिटणीस डॉ. अतुल भोसले, भाजप नेते मनोज घोरपडे, शहराध्यक्ष एकनाथ बागडी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

कराड विमानतळ विस्तारवाढीच्या प्रश्नावर मंत्री मोहोळ म्हणाले, महाराष्ट्रातला माणूस तुम्ही दिल्लीला पाठवलाय, तेव्हा योगायोगाने त्यांच्याकडे नागरी विमान वाहतूक खाते असल्याने कराड विमानतळाचा प्रश्न नक्कीच मार्ग लागेल. याबबात जिल्हाधीकार्यान्चीचारचा झाली असून कराड विमानतळ सविस्तर वाढीसाठी तब्बल ४८ सेक्टर जागेचे भूसंपादन करायचे आहे. त्यापैकी ३८ हेक्टर जागेचे संपादन झाले असून उर्वरित दहा हेक्टर बाकी असल्याचे त्यांनी सांगितले आहे. १०-१५ दिवसांत सर्व प्रक्रिया पूर्ण करून भूसंपादन झाल्यावर पुढची कार्यवाही होईल. याबाबत स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा करून जमीन हस्तांतरचा प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. कराड विमानतळ झाल्यास पश्चिम महाराष्ट्रासह सातारा व सांगली जिल्ह्याची चांगली सोय होईल. याठिकाणी एअर स्ट्रीप वाढेल. तसेच किमान ७० प्रवासी असलेले विमान उड्डाण घेऊ शकेल. त्यादृष्टीने आम्ही प्रयत्न करत असून येत्या काही महिन्यांत कराड विमानतळ सुरू होईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.



**कराड : स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीस्थळी अभिवादन करताना मंत्री मुरलीधर मोहोळ समवेत डॉ. अतुल भोसले, धैर्यशील कदम, मनोज घोरपडे व इतर**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर ते म्हणाले, मनोज जरांगे-पाटील हे राज्यभरात मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी आंदोलने करीत आहेत, यात काहीही चुकीचे नाही. २०१४ ते २०१९ दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतची भूमिका घेतली. तसा निर्णय घेऊन दहा टक्के आरक्षणही दिले. ते पुढे हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टातही टिकले. परंतु, राज्यात त्यानंतर आलेल्या महाविकास आघाडीला ते आरक्षण टिकवता आले नाही. मात्र, महायुती सरकारच मराठ्यांना आरक्षण देऊ शकेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

भाजपच्या जिल्हास्तरीय अधिवेशनाबाबत ते म्हणाले, राज्यभरात भाजपच्या नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली जिल्हानिहाय अधिवेशनने घेतली जात आहेत. त्यानुसार सर्व नेते वेगवेगळ्या जिल्ह्यात संघटनात्मक बांधणी, तसेच विधानसभेची तयारी म्हणूनही प्रयत्न करत आहेत. त्याच्या दृष्टीने कराडचेही अधिवेशन घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### मोदींच्या काळात क्रीडा क्षेत्रात नवीन धोरणे

**ऑलम्पिकमध्ये भारताची सुमार कामगिरी झाल्याच्या प्रश्नावर ते म्हणाले, गेल्या ४०-५० वर्षांत भारताला व्यक्तिगत पदके मिळाली नव्हती. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात क्रीडा क्षेत्रात अनेक नवीन धोरणे अंमलात आणली गेली. त्यानंतर कुस्ती, तसेच नेमबजी क्रीडा प्रकारात भारताला पदके मिळाली आहेत. यावर्षी त्यामानाने निराशाजनक कामगिरी राहिली. परंतु, सर्व खेळाडू प्रयत्न करत आहेत. त्याचबरोबर क्रीडा क्षेत्राबाबत सरकार, संघटना आणि नागरिकांचीही सामूहिक जबाबदारी असल्यानेही त्यांनी यावेळी नमूद केले.**

### स्व. चव्हाण यांचे देशाच्या विकासाच्या दृष्टीचे निर्णय

**स्वर्गीय यशवंतराव चव्हाण हे देशाचे मोठे नेते होते. त्याने देशाच्या विकासाच्या दृष्टीने अनेक निर्णय घेतले. कराडला आल्यानंतर त्यांच्या स्मृती नक्कीच जागृत होतात. त्यामुळे कराडला जिल्हानिहाय अधिवेशना संदर्भात आल्यानंतर प्रथमत: चव्हाण साहेबांच्या समाधीस्थळी अभिवादन केल्याचे मंत्री मोहोळ यांनी यावेळी सांगितले.**

# सरस्वती विद्यामंदिरात नागपंचमी सन साजरा

**कराड :** येथील सरस्वती विद्यामंदिरात रौप्य महोत्सवी वर्षानिमित्ताने वर्षभर विविध उपक्रम राबविण्याचा संस्थेने निर्धार केला. त्यानिमित्त नागपंचमीचे औचित्य साधून 'वीण नात्यांची' हा कौटुंबिक जिव्हाळा वाढविण्यास उपयुक्त ठरेल असा एक आगळावेगळा कार्यक्रम आयोजित केला गेला. नागपंचमीचे पारंपरिक खेळाचा अनमोल ठेवा मुलांना त्यांच्या आज्जीकडूनच मिळावा, त्यांच्यातील नात्याची वीण अधिक घट्ट व्हावी व मौखिक साहित्याचे जतन व्हावे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सणाच्या अनुषंगाने पारंपरिक खेळ तसेच आपली परंपरा जपण्याच्या दृष्टीने टाकलेले हे एक मोलाचे पाऊल होते. कार्यक्रमाची सुरुवात नागाचे व वारुळाच्या पूजनाने करण्यात आली. यावेळी संकुलातील शिक्षिका व उपस्थित सर्व पालकांनीही नाग देवतेची पूजा केली. नागपंचमी सणाची माहिती व सण साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश सांगण्यात आला. यानंतर सर्व आज्जी पालकांनी विद्यार्थ्यांना पारंपरिक खेळ शिकवले. पंचमीची गाणी, फेर, झिम्मा, फुगडी या पारंपारिक खेळांमध्ये सहभागी करुन घेतले. विविध किस्से सांगून आपल्या संस्कृतीशी जोडलेली त्यांची नाळ घट्ट केली. या कार्यक्रमामुळे त्यांच्यातील नात्यांची वीण अनोख्या पध्द्तीने गुंफली गेली. आजच्या विज्ञानयुगात तंत्रज्ञानामुळे सैल होत चाललेली नात्यांची वीण सरस्वतीच्या उपक्रमांमुळे पुन्हा घट्ट होण्यास मदत झाली अशी प्रतिक्रिया आज्जी पालकांनी व्यक्त केली.



**कराड : येथील सरस्वती विद्यामंदिरात नागपंचमी सण उत्साहात साजरा करण्यात आला.**

कार्यक्रमासाठी तिन्ही विभागाच्या मुख्याध्यापिका रुपाली तोडकर, शरयू माटे, सोनाली जोशी तसेच सर्व शिक्षक आणि विद्यार्थी व पालक मोठया संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व संयोजन वर्षा आफळे यांनी केले.

# ''सह्याद्रि'' साखर निर्यातीच्या पुरस्काराने सलग चौथ्यांदा सन्मानित

## देश पातळीवरील द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार : जशराज पाटील यांनी सन्मानपूर्वक स्वीकारला

**कराड :** सह्याद्रि सहकारी साखर कारखान्यास राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री, कारखान्याचे चेअरमन आमदार बाळासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याने सन २०२२-२३ वर्षात देशामध्ये जास्तीत जास्त साखर निर्यात केल्याबद्दलचा देशपातळीवरील व्दितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार कारखान्यास सलग चौथ्यांदा प्राप्त झाला आहे, त्याचा पुरस्कार वितरण सोहळा आज नवी दिल्ली येथे संपन्न झाला. हा पुरस्कार केंद्रीय ऊर्जा आणि अवजड उद्योग राज्यमंत्री श्रीकृष्णपाल गुर्जर यांच्या हस्ते, उत्तर प्रदेशचे ऊस विकास आणि साखर कारखानदार मंत्री लक्ष्मीनारायण चौधरी व नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीजचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थितीत सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे सभासद, संचालक, ऊस उत्पादक शेतकरी यांचे वतीने कारखान्याचे संचालक जशराज पाटील यांनी समारंभपूर्वक स्वीकारला.



**नवी दिल्ली : येथे सह्याद्रि कारखान्यास मिळालेल्या साखर निर्यातीचा पुरस्कार मान्यवरांच्याहस्ते स्विकारताना जशराज पाटील**

नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटीव्ह शुगर फैक्टरीज, नवी दिल्ली या सहकारी साखर कारखान्याच्या शिखर संस्थेच्यावतीने देशातील सर्व सहकारी साखर कारखान्यांचे मूल्यांकन करण्यात येते. व त्या आधारे ऊस उत्पादकता, तांत्रिक गुणवत्ता, वित्तीय व्यवस्थापन, अधिकतम ऊस गाळप, सर्वोत्तम साखर उतारा, सर्वात जास्त साखर निर्यात अशा विविध बाबीत उत्कृष्ठ काम करणाऱ्या साखर कारखान्यास पारितोषिके जाहिर करण्यात येतात. व त्या कारखान्याचा गौरव करण्यात येतो.

# गुणवत्ता विकास महाआभियान प्रभावीपणे राबवा : गणेश जाधव

**वाठार :** शिक्षण विभागामार्फत सध्या विद्यार्थी गुणवत्ता विकास महाअभियान सुरू आहे.या गुणवत्ता विकास महाआभियान अंतर्गत शाळा स्तरावर विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.शाळा स्तारावरील इयत्ता निहाय विविध शैक्षणिक उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शाळांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे मत मलकापूर केंद्राचे नूतन केंद्रप्रमुख गणेश जाधव यांनी व्यक्त केले.



**नांदलापुर : येथे केंद्रप्रमुख गणेश जाधव यांच्या सत्कार प्रसंगी उपस्थित शिक्षकवृंद**

नांदलापुर ता.कराड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस केंद्रप्रमुख गणेश जाधव यांनी विद्यार्थी गुणवत्ता तपासणी संदर्भाने भेट दिली यावेळी मार्गदर्शन करताना जाधव बोलत होते.

यावेळी मलकापूर केंद्राचे केंद्रसंचालाक संतोष बाबर, कराड पाटण शिक्षक सोसायटीचे माजी चेअरमन शशिकांत तोडकर, पदवीधर शिक्षिका शोभा पाटील, उपशिक्षिका नयन पाटील, राजश्री रवलेकर, प्रज्ञा अलकुंटे, मीनाक्षी शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा परिषद सातारा शिक्षण विभाग, व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था फलटण यांचे संयुक्त विद्यमाने, जिल्ह्यामध्ये सर्व प्राथमिक शाळेमध्ये सध्या विद्यार्थी गुणवत्ता विकास महाभियान सुरू आहे. या महाअभियां अंतर्गत शाळांची तपासणी करून विद्यार्थी गुणवत्ता पहाण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्या मार्फत शाळा भेटी सुरू आहेत. यासंदर्भात केंद्रप्रमुख गणेश जाधव यांनी नांदलापुर प्राथमिक शाळेस भेट देवून विद्यार्थी गुणवत्ता तसेच भौतिक सुविधांची पाहाणी केली व शाळेला मार्गदर्शक सूचना दिल्या. प्रास्ताविक व आभार नारायण सातपुते यांनी मानले.

# नांदलापुर प्राथमिक शाळेत हिमोग्लोबिन तपासणी शिबिर उत्साहात

**वाठार :** नांदलापुर प्राथमिक शाळेत मलकापूर रोटरी क्लब आणि प्राथमिक आरोग्य केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने मुलींचे हिमोग्लोबिन तपासणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. यावेळी मलकापूर रोटरी क्लब चे अध्यक्ष चंद्रशेखर दोडमनी,पर्यावरण संचालक आनंदराव बागल, सुनील बसुगडे, शिवाजीराव पाचुपते, समूदाय आरोग्य अधिकारी डॉ. दीप्ती आवळेकर, आरोग्यसेविका उषा शेळके, पदवीधर शिक्षिका शोभा पाटील, उपशिक्षिका नयन पाटील, राजश्री रवलेकर, मीनाक्षी शिंदे, प्रज्ञा अलकुंटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. दीप्ती आवळेकर यांनी इयत्ता पाचवी ते आठवीच्या मुलीचे हिमोग्लोबिन तपासणी केली. या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच कार्यक्रमाच्या वेळी डॉ. आवळेकर यांनी किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन केले. मुलींच्या विविध आरोग्य समस्या निराकरण कसे करावे यासंदर्भात मुलींना मार्गदर्शन केले.

तसेच रोटरीचे अध्यक्ष यांनी रोटरी क्लब सामाजिक बांधिलकी जोपासत विविध समाजोपयोगी उपक्रम राबवित असल्याचे सांगितले. ते म्हणाले, गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली जाईल, विद्यार्थ्यांनी स्वतःचे करिअर घडविण्यासाठी स्वतः ला झोकून देवून मन लावून अभ्यास करावा असे आवाहन केले.

डॉ. दीप्ती आवळेकर म्हणाल्या, रोटरी क्लबचे विविध सामाजिक उपक्रम कौतुकास्पद आहेत. शालेय मुलींना आरोग्य विषयी काही अडचणी असल्यास त्यांनी आमच्याशी त्वरित संपर्क करावा आम्ही योग्य ती मदत पुरवू. मलकापूर रोटरी क्लब आणि आरोग्य विभाग यांचे शाळेला नेहमी सहकार्य असते इथून पुढेही त्यांनी मुलांना योग्य ती मदत करावी अशी मागणी पदवीधर शिक्षिका शोभा पाटील यांनी केली.

कार्यक्रमाच्या वेळी नांदलापुर प्राथमिक शाळेच्या वतीने मलकापूर रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी निवड झाले बद्दल रोटरीचे नूतन अध्यक्ष चंद्रशेखर दोडमनी यांचा शाळेच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.



**ढेबेवाडी : विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्याचे वाटप करताना शैलजा पाटील व संकपाळ सर**

# पोलिस हवालदार प्रशांत चव्हाण यांची वांगव्हॅली वसतिगृहातील मुलांना मदत

**ढेबेवाडी :** प्रशांत चव्हाण यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने वांगव्हॅली वसतिगृहातील मुलांना शैक्षणिक मदत व क्रीडा साहित्याचे केलेले वाटप एक स्तुत्य उपक्रम आहे. आपण सामजिक बांधिलकी ठेवून आपल्या परीने समाजातील गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी केलेली मदत लाखमोलाची आहे असे प्रतिपादन ढेबेवाडी पोलीस स्टेशनच्या सपोनि शैलजा पाटील यांनी केले.

ढेबेवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार प्रशांत चव्हाण यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्री वाल्मिकी विद्यामंदिर तळमावले येथील वांग व्हॅली वसतिगृहातील मुलांना क्रीडा साहित्याचे वाटप केले.

यावेळी ढेबेवाडी पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी श्रीमती शैलजा पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक संपकाळ, शिक्षक जंगानी, सुतार असे उपस्थित होते.

# खानापूर विधानसभा निवडणुकीत मनसे रणशिंग फुंकणार : योगेश परुळेकर

**विटा :** खानापूर-आटपाडी-विसापूर विधानसभा मतदारसंघाच्या मनसेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक विटा येथे संपन्न झाली. पक्षाचे सरचिटणीस योगेश परूळेकर आणि जय शृंगारपुरे निरीक्षक म्हणून उपस्थित होते. खानापूर आटपाडी मतदारसंघात नवीन पर्याय मतदारांना अपेक्षित असल्यामुळे येत्या निवडणुकीत मनसेचा उमेदवार देण्याची एकमुखाने मागणी सर्व पदाधिकाऱ्यांनी निरीक्षकांकडे केली.

तरुणांच्या रोजगार, शिक्षण असे अनेक प्रश्न या महाराष्ट्रात भेडसावत असताना सत्ताधारी व विरोधक हे एकमेकांवर तोंड सुख घेण्यात व्यस्त आहेत. बाकीच्या चार ही पक्षाने केलेला विश्वासघात हे या महाराष्ट्राच्या जनतेला मान्य नाही. म्हणून या वेळी मनसे स्वबळावर निवडणुकीला सामोरे जात आहे. लवकरच राज ठाकरे यांचा खानापूर तालुक्यात दौरा होणार असून पदाधिकाऱ्यांनी तयारीला लागण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.



**विटा : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या बैठकीत बोलताना योगेश परूळेकर**

यावेळी आटपाडी तालुक्यातील एमआयडीसी खानापूर तालुक्यातील विद्यापीठ उपकेंद्र, विटा येथे उपजिल्हा रुग्णालय असे बरेच प्रलंबित प्रश्न राज ठाकरे यांनी मार्गी लावावेत अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. यावेळी मनसेचे जिल्हा अध्यक्ष तानाजीराव सावंत, सत्यवान पिंजारी, राजेश जाधव, खानापूर तालुका अध्यक्ष साजिद आगा, अपुल बुधावले, कृष्णा देशमुख, मिलिंद पवार, ओंकार तोडकर व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

### गंगुबाई पाटील यांचे निधन

**कराड :** सुपने, ता. कराड येथील गंगुबाई तुकाराम पाटील (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. शिवाजी पाटील व प्रकाश पाटील यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली, सुना, नातवंडे, नातसुना, परतवंडे असा परिवार आहे.



# कोरेगावात मंगळवारी युवा महोत्सव कार्यशाळा

**कोरेगाव :** कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग व येथील डी. पी. भोसले कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमानाने मंगळवारी ता. १३ सकाळी नऊ वाजता कॉलेजच्या डॉ. पतंगराव कदम सभागृहात सातारा जिल्ह्यात एकदिवसीय युवा उत्सव माहिती कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

युवा महोत्सव कार्यशाळा ही विविध कला प्रकारांचे शास्त्रशुद्ध आणि तांत्रिक माहिती होण्याच्या दृष्टीने आयोजित केली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून विभागाचे संचालक डॉ.पी.टी. गायकवाड उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब चव्हाण भूषविणार आहेत.

या कार्यशाळेस रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुनील खत्री, कर्मवीर विद्या प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत,माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव विजयकुमार घार्गे, विद्यापीठातील युवा महोत्सवाचे मार्गदर्शक दीपक बिडकर व सातारा जिल्ह्याचे समन्वयक. डॉ. देवानंद सोनटक्के उपस्थित राहणार आहेत.

# सगळेच मराठे वाईट नाहीत, पण ओबीसीवर चालून येतील त्यांना सोडू नका

## छगन भुजबळांचे ओबीसी मेळाव्यात वक्तव्य



**सांगली :** मनोज जरांगे यांनी सगेसोयऱ्यांची मागणी मान्य होणं शक्य नाही, सगळ्यांनाच कुणबी व्हायचं आहे मग राज्यात मराठा शिल्लक राहील का असा सवाल राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांना विचारला. सगळेच मराठे वाईट नाहीत, पण ओबीसींच्या अंगावर येणाऱ्यांना सोडू नका असं आवाहन छगन भुजबळांनी केलं आहे. सांगलीत ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्यात ते बोलत होते.

आठ आमदार निवडून आणून दाखव

ज्येष्ठ ओबीसी नेते छगन भुजबळांनी मनोज जरांगेंना पुन्हा थेट आव्हान दिलं. राज्यात २८८ जागांवर उमेदवार उभे करू असं ते म्हणतात, अरे ८८ जागा लढवून दाखव आणि त्यातले ८ निवडून आणून दाखव असं आव्हान भुजबळांनी मनोज जरांगे यांना दिलं. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देणं शक्य नाही, सगेसोयऱ्यांना देखील आरक्षण देता येणार नाही हे जरांगेंनी समजून घ्यावं असं देखील ते म्हणाले.

सांगलीचे वसंतदादा कुठे आणि आता त्याचे वारसदार कुठे असं म्हणत भुजबळांनी खासदार विशाल पाटील यांच्यावर टीका केली. तसेच मनोज जरांगे म्हणजे नवीन नेता असा उल्लेखही त्यांनी केला. आरक्षण हे आर्थिक स्थितीवर नसून सामाजिक मागासलेपणावर आहे, हे त्याला कसं समजणार असं म्हणत भुजबळांनी मनोज जरांगे यांच्यावर टीका केली. सगळे मराठे वाईट नाहीत, पण जो ओबीसीच्या आरक्षणावर उठेल त्याला मात्र सोडू नका असं भुजबळांनी म्हटलंय.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेतात आणि आपल्याच लोकांवर हल्ले करतात. आज गावागावात ओबीसींवर हल्ले होत आहेत. आरक्षण कायद्यानुसार द्या ही आमची भूमिका आहे. आमच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्या. सर्वांनाच कुणबी व्हायचं आहे तर मग मराठा शिल्लक राहील का? राज्यात ५४ टक्के ओबीसी आहेत हे जरांगे विसरतात. ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण मिळणार नाही, तसंच सग्यासोयऱ्यांना आरक्षण देणं शक्य नाही असं छगन भुजबळांनी म्हटलसय.

मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्या, आमची काही हरकत नाही. पण ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे यावरच जरांगे अडून बसलेत असं भुजबळ म्हणाले. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्यायचं की नाही ते शरद पवारांना विचारा असंही ते म्हणाले. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देता येत नाही असे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट सांगावे असे आवाहन छगन भुजबळांनी केले.

# नाट्यगृह पुन्हा उभारण्यासाठी लागणारा निधी वेळेतच देणार : अजित पवार



**कोल्हापूर :** दुर्देवी घटनेत कोल्हापूर शहरातील संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाचे अतोनात नुकसान झाले. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केलेला निधी वेळेअभावी न मिळाल्याने काम थांबले ही अडचण येवू देणार नाही, निधी वेळेतच देणार असल्याची ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी दिली. त्यांनी आगीमुळे नुकसान झालेल्या नाट्यगृहाची कोल्हापूर येथे पाहणी केली, त्यावेळी उपस्थित कलावंतांशी संवाद साधाला. ते म्हणाले, ऐतिहासिक वास्तूचे जसे बारकावे असतात तसेच पुन्हा करण्यासाठी या कामाला वेळ लागू शकतो परंतु कामे चांगली करण्यात येतील. लाकडी काम, दगडी काम आणि सिसम सारख्या लाकडांचा वापर करण्यात येणार असल्याने बारकावे लक्षात घेवून नाट्यगृह उभारण्याच्या सूचना प्रशासनाला त्यांनी दिल्या. यावेळी पालकमंत्री हसन मुश्रीफ, जिल्हाधिकारी अमोल येडगे, कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. के. मंजूलक्ष्मी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, इचलकरंजी महानगरपालिका आयुक्त ओमकार दिवटे तसेच महापालिका प्रशासनाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री यांनी कोल्हापूर मध्ये आल्यानंतर विमानतळावरून थेट केशवराव भोसले नाट्यगृहाला भेट दिली. सुरूवातीला आल्यानंतर त्यांनी भीषण आगीमुळे भस्मसात झालेल्या मुख्य रंगमंचाची पाहणी केली. याठिकाणी त्यांनी शक्य असेल तर नव्याने काम करताना नाट्यगृहाची उंची वाढविण्याच्या सूचना केल्या. नाट्यगृहाशी कलावंत आणि श्रोत्यांचं जिव्हाळ्याचं नातं जोडलं गेलं आहे. जशा कोल्हापूरवासियांच्या या नाट्यगृहाशी भावना जोडल्या आहेत त्याप्रमाणे आमच्याही भावना जोडल्या गेल्या आहेत. हे पुनर्बांधनीचे काम मोठं असून यासाठी लागणारा वेळ आर्किटेक्चरच सांगतील असेही ते यावेळी म्हणाले. मुख्यमंत्री यांनी जाहीर केलेल्या निधीपेक्षा जरी जास्त निधी लागला तरी तो दिला जाईल, मात्र नाट्यगृह पुर्वीसारखे पुन्हा तयार झाले पाहिजे अशा सूचना त्यांनी महापालिका आयुक्तांना दिल्या.

त्यानंतर त्यांनी बाहेरील संरक्षक भिंतीची पाहणी करून खासबाग मैदानावरील स्टेजच्या नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी एसी नव्याने बसविताना त्याचे बाहेरील युनिट सुरक्षित ठिकाणी बसवा. खासबाग मैदान आणि नाट्यगृहासाठी आवश्यक छताचा पत्रा उत्कृष्ट दर्जाचा वापरा. बाहेरील संरक्षक भिंतीही जुने पुरावे किंवा छायाचित्र पाहून चांगल्या पद्धतीने तयार करण्याच्या सूचना केल्या. स्वच्छतागृह, इतर भिंती आणि दगडांचे बांधकाम करताना मजबूत, एकसारखे ऐतिहासिक दिसेल अशा पद्धतीने करा. ऐतिहासिक बांधकाम करणाऱ्या आर्किटेक्चरची निवड करून त्यांच्याकडून सर्व इमारत जशी आहे तशी एकसारखी दिसेल असा आराखडा तयार करण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाला दिल्या.



# बांगलादेशातील हिंदूवर होणारे अत्याचार थांबवावे ; विश्व हिंदू परिषद

**कोल्हापूर :** विशाळगडावर अतिक्रमण बांधकाम करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, बांगलादेशातील हिंदूवर होणारे अत्याचार थांबण्यासाठी केंद्र सरकारने त्वरित हस्तक्षेप करावा यासह अन्य मागण्यांचे निवेदन विश्व हिंदू परिषद चे जिल्हाध्यक्ष कंदन पाटील यांच्या पुढाकाराने जिल्हाधिकारी अमोल येडगे यांना देण्यात आले.

विशाळगड दर्ग्याचे अतिरिक्त बांधकाम पाडण्यात यावे, तसेच या अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन करण्याचा जो अध्यादेश काढण्यात आला आहे तो तात्काळ खारीज करावा, बांगलादेशातील हिंदूवर होणारे अत्याचार थांबण्यासाठी केंद्र सरकारने त्वरित हस्तक्षेप करावा, बांगलादेशातून आलेल्या घुसखोरांना परत पाठवून तिथल्या हिंदूंना संरक्षण देण्यासाठी प्रयत्न करावेत. आदी मागण्या करण्यात आल्या दरम्यान याबाबत गांभीर्याने विचार न केल्यास सरकारला हिंदुत्ववादी संघटनांच्या तीव्र रोषास सामोरे जावे लागेल, असा इशाराही देण्यात आला.

# प्लॅस्टीक, कागदी ध्वजाचा वापर करु नका निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली

**कोल्हापूर :** दरवर्षी १५ ऑगस्ट या राष्ट्रीय दिनी तसेच इतर महत्वाच्या कार्यक्रमांच्या व क्रीडा आयोजनांच्या दिवशी लहान आकारातील कागदी व प्लॅस्टीकच्या राष्ट्रध्वजांची विक्री होते. शालेय विद्यार्थी, लहान मुले, व्यक्ती राष्ट्रभक्ती व उत्साहापोटी हे राष्ट्रध्वज विकत घेतात परंतू हे ध्वज त्याच दिवशी सायंकाळी अथवा दुसऱ्या दिवशी इतरत्र टाकले जातात, त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. यामुळे कागदी व प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज वापरु नयेत, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली यांनी केले आहे.

गृह विभागाच्या शासन निर्णयानुसार रस्त्यावर इतरत्र पडलेल्या, खराब झालेल्या व फाटलेल्या ध्वजांचे संकलन करुन राष्ट्रध्वज संहितेमध्ये नमुद कार्यपध्दतीनुसार नष्ट करण्यासाठी ग्रामपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका स्तरावर समित्या स्थापन करण्यात येत आहेत.

दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी व त्यानंतर कागदी व प्लॅस्टीकचे राष्ट्रध्वज वापरु नयेत. राष्ट्रध्वज इतरत्र टाकू नयेत. राष्ट्रध्वजाचा सन्मान करावा. तसेच सर्व नागरिक, सामाजिक संस्था, अशासकीय संस्था यासंदर्भात नेमण्यात आलेल्या शासकीय समित्या यांनीही इतरत्र पडलेले, खराब झालेले व फाटलेले राष्ट्रध्वज संकलित करावेत तसेच कोणत्याही संस्थेने किंवा व्यक्तीने स्वतःहून गोळा केलेले राष्ट्रध्वज शासकीय समित्यांकडे द्यावेत. या समित्यांनी ते स्वीकारुन खराब व फाटलेल्या राष्ट्रध्वजांची विल्हेवाट ध्वजसंहितेतील तरतुदीनुसार नेमण्यात आलेल्या समित्यांनी करावी, असे आवाहनही निवासी उपजिल्हाधिकारी. तेली यांनी केले आहे.

# सरकारनं महिलांची माफी मागावी,वडेट्टीवार संतापले

**छत्रपती संभाजीनगर :** आम्हाला आशीर्वाद दिला नाही तर लाडक्या बहिणींच्या खात्यातून १५०० परत घेण्यात येतील असं धक्कादायक वक्तव्य आमदार रवी राणा यांनी केले आहे. रवी राणांच्या या वक्तव्यावर महाविकास आघाडीने जोरदार पलटवार केलाय. रवी राणा हे शिंदे-फडणवीस आणि अजित पवारांच्या मनातले बोलले असे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले आहेत. रवी राणांचे वक्तव्य महाराष्ट्रातल्या महिलांचा अपमान आहे, त्याबद्दल सरकारने माफी मागावी अशी मागणी वडेट्टीवारांनी केले आहे. निवडणुकीच्या तोंडावर मतांसाठी योजना आणली. बहिणींना फसवण्यासाठी योजना आणली आहे. रवी राणा जे बोलला ते सरकारच्या शिंदेच्या मनातील, फडणवीस आणि अजित पवार यांच्या मनातील बोलले आहेत.

# आता चंद्र जरी मागितला तरी ते देतील, सत्ता जाणार हे त्यांना माहिती जयंत पाटलांचा टोला

**पुणे :** सत्तेत बसलेल्या लोकांना माहीत आहे की आपण सत्तेतून जाणार आहे. आता लोकांनी चंद्रदेखील मागितला तर ते देतील असा टोला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी लगावला. पवारसाहेबांना कुणी डिवचू नये, त्यांच्या एकदा डोक्यात बसलं की काय खरं नाही असं म्हणत जयंत पाटील यांनी राज्यातल्या महायुती सरकारला इशारा दिला. आरक्षणावर नुसता बोलायचं आणि निघून जायचं असं म्हणणाऱ्यांनी त्यांची नीतिमत्ता खुंटीला टांगून ठेवली आहे अशी टीकाही त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांवर केली. जयंत पाटील बारामतीमध्ये पक्षाच्या कार्यक्रमात बोलत होते.

महायुती सरकारवर टीका करताना जयंत पाटील म्हणाले की, हे महाराष्ट्र विरोधी सरकार सरकार आहे. राज्यात महाविकास आघाडी १७० ते १७५ जगावर निवडून येईल. आम्ही सांगत होतो साहेबांना, लोकसभेला १४ जागा घेऊया. पण साहेबांनी १० जागा घेतल्या. पवार साहेबांच्या डोक्यात एकदा बसलं की काय खरं नाही. त्यांनी एकदा मनावर घेतलं तर पाठ लावून सोडतात. म्हणून त्यांना कुणी डिवचू नये.

जयंत पाटील म्हणाले की, सत्तेत बसलेल्या लोकांना माहीत आहे की आपण सत्तेतून जाणार आहे. आता लोकांनी चंद्रदेखील मागितला तर ते देतील. प्रत्येक मतदारसंघात बंडखोरी कशी होईल यासाठी विरोधकांकडून प्रयत्न केले जातील. भाजपमध्ये राम राहिला नाही, भाजपला राम सोडून गेला आहे. जिथं रामाचे देवळ आहे तिथं यांचा पराभव झाला आहे. युगेंद्र पवार इथे रस घ्यायला लागले आहेत याचा आनंद आहे. युगेंद्र पवारांना आपण साथ देत आहात. नव्या रक्तात तुम्ही नेतृत्व देऊ पाहात आहात.

राज्य सरकारने सुरू केलेल्या विविध घोषणांचा संदर्भ देत जयंत पाटील म्हणाले की, ज्या लाडक्या नव्हत्या त्या आता लाडक्या झाल्या आहेत. दोन-अडीच महिने जे मिळतंय ते घ्या. ही योजना अल्पकालीन ठरू नये म्हणजे झालं. आरक्षण वेळी ते म्हणाले होते आपण बोलायचं आणि निघून जायचं. त्यातील एकाने सांगितले की आपण बोलायचं आणि निघून जाऊ. यांनी नीतिमत्ता खुंटीला टांगून ठेवली आहे.

# टोलनाक्यावरुन मनसेचा पुन्हा एकदा राडा!

**नागपूर :** राज ठाकरे यांच्या मनसेने काही महिन्यांपूर्वी टोलचा मुद्दा उचलून धरला होता. याबाबत राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेटही घेतली होती. टोल कमी करण्याचे आश्वासन दिल्यानंतर हा मुद्दा शांत झाला होता. मात्र आता पुन्हा एकदा मनसैनिकांनी टोलनाक्यावरुन नागपुरात राडा केला आहे. शहराच्या तीस किलोमीटरच्या परिसरात टोलनाका नको असा नियम असताना वाहनधारकांकडून टोल आकारला जात असल्याचा आरोप करत मनसेने हे आंदोलन केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, नागपूरजवळच्या वाडी शहराच्या अवतीभवती राज्य महामार्गावर १० किलोमीटरच्या अंतरामध्येच तीन टोलनाके आहेत. या तीनही टोलनाक्यांवर खासगी वाहनांकडून टोल वसूल केला जात नाही. मात्र, मालवाहतूक करणाया वाहनांकडून टोल वसूल केला जातो. त्यामुळे अगदी जवळ जवळ असलेल्या टोलनाक्यांमुळे माल वाहतूकदार त्रस्त झाले होते. माल वाहतूकदारांच्या या तक्रारीनंतर मनसेने आज येथील टोलनाक्यावर जाऊन खळ खट्याक स्टाईलने आंदोलन केले. टोलनाक्याची तोडफोड करण्यात आली. यावेळी पोलिसांनी ५ मनसे कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे.

# राज्यसभा पोटनिवडणुकीसाठी महायुती मराठा उमेदवाराला संधी देणार?

**मुंबई :** राज्यात नुकत्याच झालेल्या विधानपरिषदेच्या १२ जागांसाठीच्या निवडणुकीत महायुतीला ९ जागांवर विजय संपादित करता आला. त्यामुळे मनोबल उंचावलेल्या महायुतीनं आता राज्यसभा पोटनिवडणुकीसाठी तयारी केल्याचे बघायला मिळतय. राज्यसभेचे सदस्य असलेले सदस्य लोकसभेवर निवडून गेल्यानंतर १० जागा रिक्त झाल्या आहेत. तसंच रिक्त झालेल्या १० जागांपैकी ७ जागा या भाजपाच्या, तर दोन जागा काँग्रेसच्या आणि १ जागा आरजेडीची आहे. या जागांमध्ये महाराष्ट्रातून राज्यसभेवर निवडून गेलेले पियुष गोयल आणि छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या नावाचा समावेश आहे. येत्या ३ सप्टेंबरला या जागांसाठी पोटनिवडणूक होत असून महाराष्ट्रातील जागेसाठी महायुतीमधील भाजपाचा एक आणि दुसऱ्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा एक उमेदवार दिला जाणार आहे.

निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता : विधिमंडळातील महायुतीचे संख्याबळ पाहता महायुतीकडं भाजपाचे १०६ आमदार आणि मित्र पक्षांचे ८० तर दहा अपक्षांचे बळ असं एकूण १९६ आमदारांचं संख्याबळ आहे. तसंच महाविकास आघाडीकडून या जागा लढवण्याबाबत कोणताही विचार नसल्याचं सध्या तरी बघायला मिळतय. त्यामुळं या दोन्ही जागा महायुतीच्याच बिनविरोध निवडून येण्याची शक्यता आहे. यातील राज्यसभा खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांची मुदत ५ एप्रिल २०२६ रोजी संपणार असल्यानं त्यांच्या जागेवर निवडून येणाऱ्या उमेदवाराला केवळ पावणेदोन वर्षाचा कालावधी मिळणार आहे. तर राज्यसभा खासदार पियूष गोयल यांचा कार्यकाल ४ जुलै २०२८ पर्यत असल्यानं त्यांच्या जागेवर निवडून येणाऱ्या उमेदवाराला चार वर्षाचा कालावधी मिळणार आहे.

महायुतीकडून राज्यसभेसाठी मराठा कार्डचा वापर : या पोटनिवडणुकीसाठी कोणाला उमेदवारी द्यायची याबाबतचा निर्णय संसदीय पक्ष घेईल. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात नुकतीच साताऱ्यात एक घोषणा जरी केली असली तरी याबाबतचा अंतिम निर्णय हा पक्षाच्या बैठकीतच घेतला जाईल, असे भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी सांगितले. तसंच राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीनुसारच उमेदवार दिला जाईल, हे सुद्धा उपाध्ये यांनी स्पष्ट केलय. तर याविषयी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते संजय तटकरे म्हणाले, ''भाजपाने साताऱ्यातील लोकसभेचा उमेदवार हा त्यांचाच असावा यासाठी आग्रह धरला होता. तेव्हा राष्ट्रवादी काँग्रेसनंही त्यांना पाठिंबा दिला. त्यामुळं तेव्हा ठरल्यानुसार आता राज्यसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला संधी मिळणं क्रमप्राप्त आहे.'' तसंच लवकरच याची स्पष्टता होईल, असंही ते म्हणाले.

तावडे, दानवे आणि पाटील असणार उमेदवार : गेल्या वर्षभरापासून राज्यात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मराठा समाज पेटून उठल्याचं बघायला मिळतय. याचा जोरदार फटका महायुतीला लोकसभा निवडणुकीत बसला. त्यामुळं येत्या निवडणुकीत मराठा समाजाला आपल्या बाजूनं करण्यासाठी महायुती मराठा कार्ड खेळण्याची शक्यता आहे. यासाठी प्रदीर्घ अनुभव असलेले माजी खासदार रावसाहेब दानवे आणि केंद्रीय नेते विनोद तावडे यांची उमेदवारी निश्चित केली जाऊ शकते. तर दुसरीकडं राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीनं सातारा जिल्ह्यातील नेते नितीन पाटील यांची उमेदवारी निश्चित केली जाण्याची शक्यता आहे.

# शक्तीपीठ महामार्ग विरोधात शेतकरी आक्रमक

## २० ऑगस्टला कोल्हापुरात आक्रमक आंदोलन




**कोल्हापूर :** शक्तीपीठ महामार्ग विरोधात कोल्हापूर जिल्ह्यातील ५९ गावातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाधरणे आंदोलन केले. यावेळी झालेल्या चर्चेतून शासनाला आठ दिवसांची मुदत देत शक्तीपीठ महामार्ग निर्णय रद्दचा लेखी आदेश न काढल्यास २० ऑगस्ट रोजी कोल्हापुरात आक्रमक आंदोलन करण्याचा इशारा महामार्ग विरोधी संघर्ष समितीने एकमताने दिला आहे.

या आंदोलनामध्ये खा. श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, आ. ऋतुराज पाटील, गिरीश फोंडे, संजय बाबा घाटगे, सम्राट मोरे, शिवाजी मगदूम, डॉ. मधुकर बाचुळकर, विक्रांत पाटील, वसंत मुळीक, वैभव कांबळे , प्रकाश पाटील यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना खा. शाहू महाराज म्हणाले, सरकारने शेतकऱ्यांचा अंत पाहू नये. या शक्तीपीठ महामार्गाची कोणी देखील मागणी केलेली नाही. केवळ तोंडी स्थगिती न देता व शेतकऱ्यांना अंधारात ठेवत जमीन संपादनाची प्रक्रिया पुढे रेटू नये. हा महामार्ग रद्द करण्याबद्दल पोकळ आश्वासने न देता महामार्ग रद्दचा लेखी आदेश काढून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

आ. ऋतुराज पाटील म्हणाले, सतेज पाटील यांनी विधानसभेमध्ये सरकारला धारेवर धरले व हा महामार्ग रद्द करण्यासाठीचा आग्रह केला. सरकारने पंधरा दिवसात चर्चा शेतकऱ्यांशी व विरोधी पक्षाची करण्याची मान्य केले असताना याउलट पर्यावरण विभागाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवणारे हे भित्रे सरकार आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीला धक्का लावला तर खबरदार आम्ही जनप्रतिनिधी पान प्राणपणाने लढू.

समन्वयक गिरीश फोंडे म्हणाले, लाडकी बहीण व लाडका बहु असल्या योजना काढून सरकार जनतेला लास्ट देत आहे. सरकारला शेतकरी लाडका नाही का? या लाडक्या शेतकऱ्याचे म्हणणे ऐका व कंत्राटदारांचे खिसे बनणारा महामार्ग रद्द करून स्वतःचे सरकार वाचवा. महामार्ग रद्द न झाल्यास मार्गाची फेररचना करतो म्हणणारे सरकारची येणाऱ्या निवडणुकीत फेररचना आम्ही करू.

माजी आमदार संजय बाबा घाटगे म्हणाले, शेतकऱ्यांच्या घरावर नांगर फिरवून शक्तीपीठ महामार्ग जर शेतकऱ्यांच्या वर लादत असाल तर शेतकरी देखील राज्यकर्त्यांच्या घरावरती नांगर फिरवल्याशिवाय राहणार नाही. केवळ स्थगिती व पोकळ घोषणा न करता तात्काळशक्तीपीठ महामार्ग रद्द करा

यावेळी वसंत मुळीक, स्वाभिमानीचे वैभव कांबळे, सम्राट मोरे, शिवाजी मगदूम, विक्रांत पाटील, प्रकाश पाटील, मानाजीराव भोसले, कृष्णात पाटील, शिवाजी कांबळे, दादासो पाटील यांचीही भाषणे झाली.

यावेळी शेतकऱ्यांनी शक्तीपीठ महामार्ग विरोधी घोषणांनी जिल्हाधिकारी परिसर दणाणू सोडला. एकच जिद्द शक्तिपीठ रद्द, जय जवान जय किसान, शेती वाचवा देश वाचवा, शक्तीपीठ महामार्ग रद्द झालाच पाहिजे, शक्तीपीठ रद्द नाही तर सरकार रद्द, शेती आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची, लडेंगे जितेंगे अशा घोषणा दिल्या.

धरणे आंदोलनाचे निवेदन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांना देण्यात आले. माणगाव येथील शेतकऱ्यांच्या वर गुन्हे दाखल करून आंदोलन चिरडू पाहणाऱ्या हातकणंगले पोलीस स्टेशन इन्स्पेक्टर अशोक सायकर वरती कारवाई करण्याची मागणी व पर्यावरण विभागाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव गेल्याचे व स्थगिती जाहीर करून देखील गावांमध्ये नोटिसा पाठवल्याचे निदर्शनास आणून त्यांना शिष्टमंडळाने धारे वरती धरले.

यावर जिल्हाधिकारी म्हणाले, काल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पर्यावरण मंजुरी बद्दल सरकारची भूमिका जाहीर केली आहे की सरकारने अशी कोणतीही प्रक्रिया केलेली नाही तीच प्रशासनाची भूमिका आहे. आंदोलनाची स्थगिती असल्यामुळे कोणतीही प्रक्रिया पुढे भेटली जाणार नाही. आपले निवेदन मुंबईला शासनाकडे पाठवतो.

या आंदोलनामध्ये हातकणंगले शिरोळ, कागल, करवीर भुदरगड, आजरा येथील विविध गावचे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.